# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.12.2024** **वारःसोमवार**

---

1. विधानसभेच्या अध्यक्षपदी आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड निश्चित
2. विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी 106 नवनिर्वाचित सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ.
3. मतदान यंत्राबाबत सत्ताधारी आणि विरोधकांकडून आरोप-प्रत्यारोप. आणि
4. ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसऱ्या कसोटीत भारताचा दारुण पराभव; ऑस्ट्रेलियाची मालिकेत बरोबरी.

**नार्वेकर-मुंबई**

राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदावर आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. आज यासंदर्भातील औपचारिक घोषणा होणार आहे. नार्वेकर यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षपदासाठी काल दुपारी बारा वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र, महायुतीकडून केवळ नार्वेकर यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणाचाही अर्ज दाखल न झाल्यानं नार्वेकर यांची निवड बिनविरोध होणार आहे. विधानसभेच्या विशेष अधिवेशनात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचं आज अभिभाषण होणार आहे.

**शपथविधी**

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी काल 106 नवनिर्वाचित सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते. महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापराचा निषेध म्हणून पहिल्या दिवशी शपथ घ्यायला नकार दिला होता. मात्र अधिवेशनाचं कामकाज सुरु होण्याआधी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बैठक घेतली; यात बहिष्कार मागे घेऊन सदस्यत्वाची शपथ घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**ईव्हीएम-आरोप प्रत्यारोप-मुंबई**

दरम्यान सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी काल विधानभवनाच्या पायऱ्यांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीचा निषेध केला. महाविकास आघाडीकडून मतदान यंत्रावर शंका घेणं हा संविधानाचा अपमान असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. तर निवडणुकीतल्या अपयशाचं खापर मतदानयंत्रावर फोडण्याची विरोधकांची कृती लोकशाहीला अपायकारक असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. लोकांनी काम करणाऱ्यांना निवडून दिलं आहे, विरोधी पक्ष ईव्हीएमबाबत दुटप्पी भूमिका घेत आहे, असं शिंदे वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

**इव्हीएम-सातारा**

संविधानिक मुल्यांनुसार निवडणूक आयोग स्वायत्त संस्था आहे, मात्र त्याचे आयुक्त निवडण्याच्या प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेरफार केले. यामुळे ही निवडणूक अप्रत्यक्षपणे सरकारकडूनच होत आहे. सरकारकडून होणारी नेमणुक सरकारला अपेक्षितच काम करते. यामुळे आयोगाची स्वायत्तता आणि स्वतंत्रता धोक्यात आली असून त्याची कार्यपध्दती सरकारी खात्याप्रमाणेच सुरु असल्याची टिका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काल सातारा इथं पत्रकार परिषदेत

केली. याचवेळी त्यांनी ईव्हीएम वापराविरोधात देशव्यापी आंदोलन छेडण्याची, सह्यांची मोहिम राबविणार असल्याची माहिती दिली.

**मारकडवाडी-सोलापूर, नाशिक**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील प्रत्येक गावाने आता मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठीचा ठराव करावा तो आपण आमदार उत्तम जानकर यांच्यामार्फत निवडणूक आयोगापर्यंत पोहोच करु अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे. ते काल मारकडवाडी इथं बोलत होते. लोकशाही टिकविण्यासाठी ईव्हीएम यंत्र नको, ही चळवळ अधिक तीव्र करण्याची गरज आहे, असं ते म्हणाले. दरम्यान मारकडवाडी ग्रामस्थांच्या शंकांचं निरसन निवडणूक आयोगाने करावं असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी काल नाशिकमध्ये व्यक्त केलं.

**सोलापूर जिल्हाधिकारी**

माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी इथं विधानसभा निवडणूकीत झालेली मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षितच पार पडली आहे, असा खुलासा सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केला आहे. काल संध्याकाळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. मतदान प्रक्रियेवर अश्वास दाखविणे लोकशाहीला घातक ठरु शकते. जे या मतदान प्रक्रियेवर अविश्वास दाखवत आहेत; त्यांनी पुराव्यानिशी वेळेत तक्रार करणं अपेक्षित होतं; मात्र निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळेत त्या ठिकाणाहुन कोणाचीही तक्रार आलेली नाही. त्यामुळे आता फेरमतदानाची मागणी करणे तसेच मतदान प्रक्रियेवर अविश्वास दाखविणे योग्य नाही, असं जिल्हाधिकारी म्हणाले.

**इव्हीएम तपासणी-नांदेड**

नांदेड जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभेच्या निवडणुकीत झालेल्या मतदानाची व्हीव्हीपॅटची आकडेवारी जुळते का याची तपासणी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनाप्रमाणे करण्यात आली. यात जिल्ह्यातील लोकसभेच्या 30 आणि विधानसभेच्या 45 अशा 75 केंद्रावरील मतमोजणी बिनचूक असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली आहे.

**डॉक्टर डोळे**

आदिवासी ग्रामीण भागातील लाखो नेत्ररुग्णांच्या जीवनातील अंध:कार दूर करण्याचं काम करणारे डॉक्टर मनोहर डोळे यांचं नुकतंच निधन झालं. त्यांच्या जीवन कार्याचा हा आढावा.....

**आदिवासी ग्रामीण दुर्गम भागातील गरजू आणि वंचित समाजातील नेत्र रुग्णांच्या सेवेसाठी डॉक्टर डोळे यांनी आपलं अवघ जीवन समर्पित केलं. शहरातील सुविधांपासून दूर राहण्याचा निर्णय घेत डॉक्टर मनोहर डोळे काही दशकांपूर्वी नारायणगावमध्ये स्थायिक झाले होते. त्याकाळी दळण वळणाची फारशी साधनं नसताना वेळ प्रसंगी सायकल बैलगाडी अशा मिळेल त्या वाहनाने प्रवास करून अतिशय प्रतिकूल परिस्थितीत खेड्यापाड्यातील लोकांना त्यांनी वैद्यकीय सेवा पुरवली. नारायण गावात त्यांनी नेत्र रुग्णालयाची स्थापना करून गरजू नेत्र रुग्णांवर त्यांनी मोफत मोती बिंदू शस्त्रक्रिया केल्या. हजारो मोफत नेत्र तपासणी शिबिरं देखील घेतली. दोन लाखाहून अधिक रुग्णांवर त्यांनी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन केंद्र सरकारनं यावर्षी त्यांना पद्मश्री देऊन सन्मानित केलं होतं. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.**

**महाकुंभ**

उत्तरप्रदेशमधील प्रयागराज इथं होणाऱ्या महाकुंभ मेळाव्याला उपस्थित राहण्यासाठी उत्तरप्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रण दिलं आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या पवित्र नद्यांच्या संगमावर पुढच्या वर्षी 13 जानेवारी ते 26 फेब्रुवारी या कालावधीत महाकुंभमेळा होणार आहे.

**शिवप्रताप दिन-सातारा**

किल्ले प्रतापगडावर काल शिवप्रताप दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भवानी मातेची महापूजा करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला. तसंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. लाठी काठी, तलवारबाजी, दांडपट्टा, कुऱ्हाडबाजी, अग्निचक्र, आदी ऐतिहासिक साहसी खेळांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली.

**शि. द. फडणीस**

कोणतीही कलाही राजवाड्यात पोहोचण्यापेक्षा ती लोकांमध्ये पोहोचणं आवश्यक असतं, दुर्दैवानं आजही चित्रकला घराघरात रूजली नाही, त्यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे, असं मत ज्येष्ठ हास्य चित्रकार शि. द. फडणीस यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. चतुरंग प्रतिष्ठानतर्फे आयोजित रंगसंमेलनात ज्येष्ठ हास्य चित्रकार शिवराम दत्तात्रेय तथा शि. द. फडणीस यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला, त्यावेळी पुरस्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

**क्रिकेट**

बॉर्डर-गावस्कर करंडक क्रिकेट स्पर्धेतल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा 10 गडी राखून पराभव केला. भारतीय फलंदाजांची अतिशय सुमार कामगिरी हे या परभवाचे कारण ठरले. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाने 337 धावा करून 157 धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात भारताच्या एकाही फलंदाजाला 50 धावांचा टप्पा गाठता आला नाही. भारताचा दुसरा डाव 175 धावांवर संपला. त्यामुळे यजमानांना विजयासाठी केवळ 19 धावांचे लक्ष्य मिळाले आणि ते त्यांनी सहज पूर्ण केले. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने मालिकेत 1-1 अशी बरोबरी केली आहे. मालिकेतील पुढील सामना 14 डिसेंबरपासून ब्रीस्बेन इथं होणार आहे. दुबईमध्ये 19 वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात काल बांगलादेशने भारताचा 59 धावांनी पराभव केला. 199 धावांचं आव्हान गाठताना भारताला 139 धावा करता आल्या.

**हवामान**

जळगाव इथं काल सर्वात कमी 10 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.